# 'वनमॅन नेटवर्क'ची यशोगाथा




**प्रदीप लोखंडे, पुणे-१३**
**रूरल मार्केटिंगची, गोष्ट कोटींची**
सुमेध वडावाला (रिसबूड)
मेनका प्रकाशन
**पृष्ठे**: २३२
**मूल्य**: २२० रुपये

**ग्रा**मीण भागातून पुण्यात शिक्षणासाठी आलेला एक धडपड्या मुलगा. आपल्या सर्वमान्य शिक्षणपद्धतीच्या यशाच्या कल्पनांमध्ये फिट्ट न बसणारा, पण स्वत:च्या आवडीतून आणि दूरदृष्टीतून ग्रामीण भारताशी आपली नाळ जोडलेला. बड्या कंपन्यांची मार्केट विस्ताराची गरज ओळखून हजारो गावांचा डाटाबेस गोळा करून त्यातून कल्पकतेने आपला व्यवसाय उभा करणारा. या व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणारा. लाखो लोकांशी केवळ पोस्टाच्या जोडकार्डांच्या आधारे संपर्कात राहून स्वत:ची प्रगती साधत असतानाच जोडलेल्या माणसांनाही प्रामाणिक प्रयत्नातून समृद्धीची दिशा दाखवणारा. 'अनिवासी गाववासी' चळवळीच्या माध्यमातून अनेक शाळांना संगणक उपलब्ध करून देणारा, ग्रामीण भागात शाळा-शाळांतून 'ग्यान की लायब्ररी' सुरू करणारा आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे 'रूरल मार्केटिंग'मधे भारतात नाव कमावलेला माणूस म्हणजे प्रदीप लोखंडे!

याच प्रदीप लोखंडे यांची यशोगाथा अत्यंत साध्या-सोप्या भाषेत सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी 'प्रदीप लोखंडे, पुणे--१३, रूरल मार्केटिंगची, गोष्ट कोटींची' या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर आणली आहे. ज्यांना प्रदीप लोखंडे ही व्यक्ती कोण हे नव्याने सांगायची गरज नाही त्या व्यक्ती हे पुस्तक वाचतीलच यात शंकाच नाही, पण ज्यांना ही व्यक्ती माहीत नाही त्यांनी तर आवर्जून वाचावं असंच हे पुस्तक आहे.

असं काय आहे या पुस्तकात? तर बेताची आर्थिक परिस्थिती असलेल्या सामान्य घरातील मुलगा जिद्दीच्या जोरावर पुस्तकी शिक्षणाबरोबरच स्वत:च्या कल्पनेतून अनुभवाचं शंभर नंबरी शिक्षण घेतो आणि त्यातून स्वत:चं करियर विकसित करत स्वत: समृद्ध होतानाच ग्रामीण भारताला समृद्ध करण्यासाठीही झटतो, ही गोष्ट या पुस्तकातून वाचकांसमोर उलगडली जाते. शाळेच्या नवव्या इयत्तेत असताना आपल्या गावात 'राजकारण गेलं चुलीत' या नाटकाचा प्रयोग लावण्याचं धाडस

दाखवण्यापासून ते पुढे व्यवसायाचं नेटवर्क उभं करत भारतातल्या हजारो गावांचा अद्ययावत डाटाबेस गोळा करून तो बड्या कंपन्यांना ग्रामीण भागात त्यांच्या मार्केट विस्तारासाठी उपलब्ध करून देणं, त्यातून या कंपन्याच्या उत्पादनांची ग्रामीण भागात तेथीलच हजारो तरुणांच्या माध्यमातून प्रसिद्धी करणं, त्यातून त्यांना रोजगार मिळवून देणं, असे अनेक यशस्वी प्रयोग प्रदीप लोखंडे यांनी केले आहेत. ही गोष्ट नक्कीच सोपी नाही.

'हिन्दुस्तान लिव्हर'पासून 'एशियन पेंट्स'पर्यंत आणि 'टाटा टी'पासून 'पार्ले'पर्यंत अनेक बडे उद्योग आज त्यांचे क्लाएंट आहेत. एके काळी अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जगलेला हा माणूस आज 'मर्सिडीज'मधून फिरतोय. स्वतः व्यवस्थापनशास्त्राचं शिक्षण न घेतलेला हा माणूस आज देशातल्या प्रतिष्ठित व्यवस्थापन महाविद्यालयांतून लेक्चर्स देतोय. अर्थात एवढीच त्यांची ओळख नाही. 'बिझनेस' आणि 'आयडॉलॉजी' यांचा मेळ घालत त्यांनी आगळं मॉडेल निर्माण केलंय, ज्यातून ग्रामीण भागातल्या तरुणांना करियरच्या वाटा मिळताहेत, गावातल्या विद्यार्थ्यांना संगणक हाताळता येताहेत, त्यांचं ज्ञानसंवर्धन होतंय. त्यांचा हा सारा प्रवास थक्क करणारा आहे.

मौर्य डिस्ट्रिब्युटर्सची स्थापना, इंडियन कॉर्पोरेट रिसोर्स सेंटरची सुरुवात, बिझनेस सेंटरची सुरुवात, या सगळ्यात अगदी राहण्याच्या सोयीपासून भांडवल गुंतवणुकीपर्यंत आणि ऑफिसला विनामोबदला जागा उपलब्ध करून देण्यातही ज्या ज्या मित्रांनी मदत केली त्या सर्वांची नावं या पुस्तकात सार्थ अभिमान आणि कृतज्ञतेच्या भावना या मिश्रणासह आपल्यासमोर येतात. केवळ मित्रच नव्हे तर आपली पत्नी सीमंतिनी, वडील, आई, आपल्या मुली आणि इतर नातेवाइकांनी केलेल्या मदतीचाही उल्लेख यात त्यांनी जाणीवपूर्वक केला आहे. पाच हजार मुला-मुलींचं व्यक्तिमत्त्व विकसित करण्यात आणि भारतातील सहा लाख व्यक्तींशी पत्रपरिचय करून घेण्यात पत्नी आणि वडिलांचा मोलाचा वाटा असल्याचं ते मान्य करतात. त्याचबरोबर भारतातील सर्व क्षेत्रांतील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींशी ग्रामीण भागापर्यंत ज्ञान आणि विकासगंगा पोहोचवण्याच्या दृष्टीने झालेला पत्रव्यवहार आणि गाठीभेटी, शाळा-कॉलेजच्या मुलामुलींचं अनुभवविश्व विस्तारण्यासाठी केले गेलेले प्रयत्न, त्यांना आलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींचे अनुभव हे सर्व या पुस्तकात वाचायला मिळतं. प्रदीप लोखंडे यांनी हे सर्व साध्य केलं ते त्यांच्या 'रूरल रिलेशन्स' या व्यवसायाच्या माध्यमातून. त्यांची ही सगळी यशोगाथा मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

**राधिका कुलकर्णी**